सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
दूरध्वनी :- (०२२)२२६९२५१५.
(०२२) २२६२०१११ विस्ता. १२३

पोलीस विभाग
पोलीस उप आयुक्त (अंमलबजावणी)
गुन्हे शाखा, गु.अ.वि., यांचे कार्यालय,
डॉ. दा. नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१.

Email ID : dcpenforcement-mum@mahapolice.gov.in

---

क्रमांक :- पोउआ/अंमलबजावणी/१९१/२०२४, दिनांक:१९ एप्रिल, २०२४.

प्रति,

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
मुंबई.

विषय : न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यासाठी व त्याबाबतच्या शिफारशी करण्यासाठी गठीत समितीच्या प्रभावी अंमलबजावणी करिता सूचना.
माहे जानेवारी - २०२४ ते मार्च २०२४ चा त्रैमासिक अहवाल.

संदर्भ : १) शासन परिपत्रक क्र. डीपीपी/२०१५/प्र.क्र.५१/पोल-१०, दि. १७/१०/२०१५
२) जा.क्र. ४६८/पोउआ/प्रकटीकरण/२०१६, दि. ०६/०४/२०१६.
३) शासन परिपत्रक क्र. केमाअ-१११६/प्र.क्र.५०/पोल-१०, दि. २९/११/२०१६
४) क्र. पोमसं/२१/माअ/आशुतोष शुक्ला/२२८/१६, दि. ०१/०३/२०१७.

उपरोक्त विषय व संदर्भान्वये न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यासाठी व त्याबाबतच्या शिफारशी करण्यासाठी पोलीस उप आयुक्त (अंमलबजावणी) कार्यालयाच्या अधिनस्त गठीत समितीची दिनांक १९/०४/२०२४ रोजी त्रैमासिक बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीचे जा.क्र१९०/पोउआ/अंमल/२०२४, दिनांक १९/०४/२०२४ अन्वयेचे इतिवृत्त सोबत जोडून माहिती व पुढील कार्यवाहीकरिता सविनय सादर करण्यात येत आहे.

R. Ragsudha
(रागसुधा आर.)
पोलीस उप आयुक्त (अंमलबजावणी)
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

Scanned with CamScanner

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
दुरध्वनी :- (०२२)२२६९२५१५.
(०२२) २२६२०१११ विस्ता.
१२३

पोलीस विभाग
पोलीस उप आयुक्त (अंमलबजावणी)
गुन्हे शाखा, गु.अ.वि., यांचे कार्यालय,
डॉ. दा. नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१.

Email ID : dcpenforcement-mum@mahapolice.gov.in

क्रमांक :- पोउआ/अंमलबजावणी/ १९० /२०२४, दिनांक:- १९ एप्रिल, २०२४.

## इतिवृत्त

शासन परिपत्रक क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र ५१/पोल १०/दि. १७/१०/२०१७ अन्वये गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक दि. १९/०४/२०२४ रोजी आमच्या दालनात आयोजीत करण्यात आलेली होती. सदर बैठकीस सदस्य श्री. संजू सि.जॉन, सहाय्यक पोलीस आयुक्त(अंमलबजावणी) गुन्हे शाखा, गुअवि, मुंबई हे हजर आहेत. परंतू दिनांक १३/०९/२०२२ पासून विधी अधिकारी यांची नेमणूक पोलीस उप आयुक्त(अंमलबजावणी) कार्यालयासाठी करण्यात आलेली नाही.

न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्तांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास, संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यासाठी व त्याबाबतच्या शिफारशी करण्यासाठी चर्चा करण्यात आली असता. माहे जानेवारी - २०२४ ते मार्च - २०२४ च्या दरम्यान पोलीस उप आयुक्त(अंमलबजावणी) कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या अंमलबजावणी शाखा व जापू शाखा यांच्याकडे असलेल्या न्यायालयीन प्रकरणाचा मा. न्यायालयाचा निकाल शासनाच्या विरुध्द असल्याने सदरबाबत शासन परिपत्रकातील प्रपत्रा प्रमाणे अहवाल सोबत जोडण्यात आला आहे.

(संजू सि. जॉन)
सपोआ(अंमलबजावणी)
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई
सदस्य

R.Pl.
(रागसुधा आर.)
पोउआ (अंमलबजावणी),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई
अध्यक्ष

प्रत माहिती व कार्यवाही करिता सविनय सादर
१) मा. अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), मुंबई.
२) मा. पोलीस उप आयुक्त, (प्रकटीकरण), गुन्हे शाखा, गुअवि, मुंबई.

Scanned with CamScanner

शासन परिपत्रक, गृह विभाग, क्र. डीपीपी-२०१५/प्र.क्र.५१/पोल-१०, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ अन्वये सोबतचे प्रपत्र

पोलीस उप आयुक्त (अंमलबजावणी), गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

समिती बैठकीचा दिनांक - १९/०४/२०२४.

| अ क्र | प्रकरण क्रमांक/मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्याय निर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे? | जबाबदार असल्यास त्यांची नांवे, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | ५४ वे न्यायालय, माझगाव. | समाजसेवा शाखा गु.र.क्र. ००/०७.<br><br>कोर्ट केस क्र. ५४००२१४/पीडब्ल्यू/२२ जुना कोर्ट केस क्र. (६२/पीडब्ल्यू/२००८) | १६/०१/२००८. | १५/०३/२०२४ | मा. न्यायालयात सादर करण्यात आलेले पुरावे हे आरोप सिध्द करण्या इतपत सबळ व पुरेसे नसल्याने दोषमुक्त निकाल दिला.<br><br>१) फिर्यादी प्रिया अशोक चव्हाण हे कॉपी राईट कंपनीचे प्रतीनिधी असून त्यांना कॉपी राईटचे तांत्रिक ज्ञान नव्हते.<br><br>२) पंच सनातन सुर्यवंशी यांनी आपली साक्ष फिरवली.<br><br>३) तत्कालीन सेवानिवृत्त तपासी अधीकारी पो. उ. नि. किसन शिरसाट यांना कॉपी राईटचे तांत्रिक ज्ञान नव्हते.<br><br>४) मुद्देमाल मिळून न आल्यामुळे मा. न्यायालयात सादर करण्यात आला नाही. | नाही. | — | |

Scanned with CamScanner

| अ क्र | प्रकरण क्रमांक/मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्याय निर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निदोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे? | जबाबदार असल्यास त्यांची नांवे, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५४ वे न्यायालय, माझगाव. | समाजसेवा शाखा/ गु.र.क्र. ००/२००७.<br><br>कोर्ट केस क्र. ५४००२१५/पीडब्ल्यू/२२<br>जुना कोर्ट केस क्र. (४७७/पीडब्ल्यू/२००७) | २९/०६/२००७ | २५/०१/२०२४ | मा. न्यायालयात सादर करण्यात आलेले पुरावे हे आरोप सिध्द करण्या इतपत सबळ नसल्याने<br><br>१) फिर्यादी बपिस्ट रॉडीक्स हे कॉपी राईट कंपनीचे प्रतीनिधी असून त्यांनी आरोपीला ओळखले नाही.<br><br>२) फिर्यादी यांना हिंदी मराठी चित्रपटाच्या किती सीडी जप्त केल्या याबाबत माहिती नाही.<br><br>३) फिर्यादी यांना जप्त केलेल्या हिंदी मराठी चित्रपटाची नावे माहिती नाही.<br><br>४) पंच, तपासी अधिकारी व साक्षीदार हे मा. न्यायालयात उपस्थित राहिले नाहीत. | नाही. | — | |

Scanned with CamScanner

| अ क्र | प्रकरण क्रमांक/मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्याय निर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे? | जबाबदार असल्यास त्यांची नांवे, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ५४ वे न्यायालय, माझगाव. | समाजसेवा शाखा. गु.र.क्र. ६८१/२००७.<br><br>कोर्ट केस क्र. ५४०१११०/पीडब्ल्यू/२१ | | १४/०३/२०२४ | मा. न्यायालयात सादर करण्यात आलेले दोषारोप पत्र हे आरोपीला आरोपी म्हणुन सिध्द करण्या इतपत सबळ नसल्याने आरोपी क्र ११ जया सुरेश भगत उर्फ जया तलाक्षी छेडा हिला मा. महानगर दंडाधिकारी यांनी दोषमुक्त निकाल दिला. | नाही. | — | |

दिनांक १३/०९/२०२२ पासून विधी अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली नाही.
पोलीस उप आयुक्त (अंमलबजावणी) कार्यालयाचे विधी अधिकारी
सदस्य

(संजू सि.जॉन)
सहाय्यक पोलीस आयुक्त (अंमलबजावणी)
गु.शा.गुअवि, मुंबई,
सदस्य

(रागसुधा आर.)
पोलीस उप आयुक्त (अंमलबजावणी)
गुन्हे शाखा, गुअवि, मुंबई.
अध्यक्ष

Scanned with CamScanner